Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Oct 2022 Issue - 60 Vol. 1

CURRENT GLOBAL REVIEWER

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

393

47. भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या आणि आव्हाने 157
प्रा.डॉ.पांडुरंग खं. नेवरकर

48. राष्ट्रीय राजकारणातील घटक म्हणुन उदय पावलेली राज्ये आणि त्यांचा मर्यादा. 160
डॉ. अंकुश अंबादासराव चव्हाण

49. भारतीय लोकशाही आणि नागरिकांची भूमिका– एक अभ्यास. 163
प्रा.डा.देविदास ग्यानुजी नरवाडे

50. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने 167
शिंदे नितीन लक्ष्मणराव

51. लोकशाहीतील प्रसार माध्यमांची भूमिका व महत्व 170
डॉ. मोगले राजेश दत्तात्रय

52. भारतीय लोकशाहीची वाटचाल 172
सुभाष किसनराव पोले

53. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने 177
प्रा. विकास दशरथ वाघमारे

54. भारतीय लोकशाही तत्व आणि व्यवहार 180
डॉ. अर्जुन येरगे

55. लोकशाहीचा तात्वीक विचार व कार्यपद्धती 182
बालाजी जांबुतकर

56. भारतीय लोकसंख्या वाढ : लोकशाहीपुढील प्रमुख्य समस्या 186
गणेश नामदेव घोडेकर

57. लोकशाही : लोकशाहीसाठी आवश्यक परिस्थिती 188
अनिल नारायणराव पंडित

58. भारतीय लोकशाही आणि हिंदू कोड बील 190
सिमला वन्सीधर तुपसमिंद्रे

59. भारतीय लोकशाही व महिला 193
उषा देवराव किरवले.

60. शास्वत विकास इक्कीसवीं सदी की नई चुनौतियां 197
डॉ.कांबळे सुनील सोजरराव

61. 'खेळातील विकृत राजकारण रोखणे हे भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान' 199
Dr. Gunaji P. Nalge

62. भारतीय लोकशाही आणि समाज माध्यमे 201
डॉ. जाधव बप्पा संभू

63. क्रीडेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांची जोपासना 204
डॉ. संदीप चा. लोंढे



SHIVAJI COLLEGE HINGOLI
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

394

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648

Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

# 'खेळातील विकृत राजकारण रोखणे हे भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान'

preventing Perverse politics in sports is a challenge for Indian democracy

Dr. Gunaji P. Nalge

Sports Director

Shivaji College, Hingoli

SHIVAJI COLLEGE HINGOLI

सारांश :- (Abstract) समाजकारण आणि राजकारण हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत लोकशाहीत लोकांना निर्णय घेण्याचा अधिकार असतो. कोणाचा कोणावर अतिरिक्त दबाव नसतो, कोणी कोणाचा मालक नसतो, सर्वांना समान अधिकार असतात. मग ते कोणतेही क्षेत्र असो व्यवसायात एकाधिकार शाही नसते. राजकारणात कोणी हुकूमशहा नसतो सर्वांना समान न्याय असतो. तसेच खेळ हा खेळ भावनेतून खेळला जातो, खेळात भेदभाव नसतो, राजकारण केले जात नाही पण आज लोकशाही ही लोकशाही न राहता तिने हुकूमशाहीचे रूप धारण केले आहे. प्रत्येक जण स्वतःला मालक समजत आहे. राजकारणात लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक असतो, पण तो सध्याच्या लोकशाहीत स्वतःला हुकूमशाह समजत आहे. आणि जनतेला गुलाम केले आहे. मन मानेल राजकारण केले जात आहे. प्रत्येक क्षेत्रात दंडेल शाही चालू झाली आहे. राजकारणाचा गैरवापर केला जात आहे. खेळातही राजकारणाने शिरकाव केला आहे. राजकारणामुळे खेळात खेळभावना न राहता सुडाची भावना निर्माण होत आहे. गलिच्छ राज कारणामुळे खेळाडूंचा बळी घेतला जात आहे. खेळातील विविध संघटना हे भेदभावाचे राजकारण करत आहेत. यातून खेळाचे अतोनात नुकसान होत आहे. खेळाडू सोबत खेळाचा बळी घेतला जात आहे हे लोकशाहीत घातक आहे.

Keywords :- लोकशाही, राजकारण, खेळ, संघटना, खेळाडू.

प्रस्तावना:- (Introduction) भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात विविध भाषा, पोशाख, व्यवसाय, जाती, धर्म, खेळ, समाजसुधारक, कलाकार, राजकारणी, खेळाडू, संस्कृती अशा विविधतेत भारताचा विकास होत आहे. भारत हा एक सुजलाम सुफलाम देश म्हणून जगात नाव रुपाला येत आहे. भारताचा विकास हा भारतीय व्यवसाय, कृषी उद्योग, औद्योगिक प्रगती, शैक्षणिक प्रगती, आर्थिक प्रगती त्याचबरोबर क्रीडा क्षेत्रातील प्रगती होणे यावर अवलंबून आहे. समाजात समाजाचा विकास हा समाज सुधारकावर अवलंबून असतो. तसाच चांगल्या राजकारण्यावर पण अवलंबून असतो. समाजावर प्रभाव टाकणारे कलावंत, लेखक, राजकीय तज्ञ, संत, उत्कृष्ट खेळाडू यांचेही समाज मनावर प्रतिबिंब उमटत असते. यांच्या आचरणातून अनेक जण प्रेरित होत असतात. यांच्या चांगल्या वागण्यातून समाजाचा देशाचा विकास होतो तर यांच्या बेताल वागण्यामुळे, कृतीमुळे, समाजाचा, देशाचा, खेळाचा आणि खेळाडूचा ऱ्हास होतो, नुकसान होते. खेळाचा चांगल्या राजकारणामुळे विकास होतो, फायदा होतो, खेळ बाढीस लागतो पण विकृत राजकारणी खेळाच्या सानिध्यात आले, खेळावर आपले वर्चस्व गाजवायला लागले तर खेळाचा विनाश, खेळाचा खेळ खंडोबा झाल्याशिवाय राहत नाही. विकृत राजकारण खेळात आले कि त्याचा खेळाडूच्या खेळावर, मनावर वाईट परिणाम होतो. खेळ खेळ न राहता ते एक राजकारन्याचा अड्डा बनतो, यात सट्टा बाजारचा सट्टा चालतो. मान सन्मानासाठी हेवे दावे केले जातात. मी मोठा राजकारणी, समाज सुधारक पैसेवाला असल्यामुळे मीच खेळाचा विकास करू शकतो, मीच खेळाला पुढे नेऊ शकतो. अशी शेखी मिरवली जाते. यात जर कोणी अडकाठी आणण्याचा प्रयत्न केला तर त्याला खेळासोबतच आयुष्यातून उठवण्याचा प्रयत्न केला जातो. पुन्हा कोणाची हिम्मत विरोध करण्यासाठी होणार नाही अशी कृती केल्या जात आहे. असे अनेक प्रकार गोर-गरीबा सोबत, दिन-दलिता सोबत, गुणवंत खेळाडू सोबत घडत आहेत. असे प्रकार समाजासाठी, देशासाठी आणि लोकशाहीसाठी घातक आहेत. भारतीय लोकशाहीला खिळ खिळे आणि कमजोर करण्याचा प्रयत्न विकृत राजकारण्यान कडून केला जात आहे. याला रोखणे हे भारतातील लोकशाही समोर मोठे आव्हान आहे.

उद्देश :-(Purpose)1) विकृत राजकारणाचा खेळात होत असलेला शिरकाव.

2) लोकशाही समोरील आव्हाने कोणती.

गृहीतके:- (Hypothesis)1)खेळातील विकृत राजकारणामुळे खेळाडूंचा बळी जात आहे.

3) खेळातील संघटनामधील राजकारणामळे खेळाडूंचे स्वातंत्र्य हिरावल्या जात आहे.

4) राजकीय लोकांचा खेळात हस्तक्षेप लोकशाहीस हानिकारक.

विषयाचे महत्त्व:- (Importance of Subject) समाजात विविध जाती धर्माचे लोक राहतात. समाजाचा विकास हा समाजातील राजकारणी, कलावंत, समाज सुधारक, तत्त्वज्ञ, लेखक, खेळाडू, सावकार, शेतकरी, कामगार यावर अवलंबून असतो. यांच्या चांगल्या गुणामुळे लोकशाही बाळीस लागते. यातील काही लोकांच्या बेताल वागण्यामुळे लोकशाही धोक्यात येते. नकारात्मक भाव तयार होतो, यातून एकमेका विषयी द्वेष तयार होतो आणि त्या द्वेषा मुळे अनेकांचे बळी जातात. याला खेळाडूही अपवाद नाहीत. उदाहरणार्थ नरसिंग



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

395

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

यादव आणि डोपिंग यामुळे पूर्ण भारतीय क्रीडाविश्व बदनाम झाले. खेळाला गालबोट लागले, तो फक्त ड्रग्स घान बळी ठरला नाही तर घाणेरड्या संघटनात्मक राजकारणाचा, वर्चस्वाचा बळी ठरला. 'मला नाही तर तुला नाही' असे गचाळ राजकारण खेळात सुरू झाले. एखाद्या खेळाडूंनी आयुष्यभर मेहनत करून यश संपादन करण्यासाठी प्रयत्न करणे आणि नकारात्मक राजकारणामुळे त्याला गडबडीने डोपिंग मध्ये अडकवणे, घातपात करणे हे कितपत योग्य आहे. एखाद्या खेळाडूचे करिअरच संपुष्टात अन्यापर्यंतचे होत असलेले प्रकार, प्रयत्न, राजकारण हे क्रीडा विश्वासाठी अतिशय घातक आहे. भारतीय क्रीडारसीकासाठी संताप जनक आहे. क्रीडा संघटना आणि राजकारण हे कुस्तीपुरते मर्यादित न राहता इतर बॅडमिंटन, क्रिकेट , टेनिस अशा अनेक संघटनात राजकारणाशिवाय खेळ होत नाही. कुठे गटातटाचा वाद सुरू आहे तर कुठे खेळाडू खेळाडूत, कुठे क्रीडा संघटनात वाद सुरू आहेत. बऱ्याच खेळांच्या दोन-तीन संघटना कार्यरत आहेत यांच्या अंतर्गत राजकारणामुळे खेळाचे, खेळाडूचे नुकसान होत आहे.

भ्रष्टाचारी राजकारणी यांच्यामुळे खेळाला हानी पोहोचत आहे. दोन देशातील ताणल्या गेलेल्या संबंधामुळे त्याचे क्रीडा क्षेत्रावर पडसाद उमटत आहेत. कोणत्या ना कोणत्या कारणाने दोन शेजारी राष्ट्रात कुरबुरी चालूच असतात त्याचा परिणाम खेळावर, स्पर्धा वाईट होतो. उदाहरणार्थ भारत पाकिस्तान संबंध पण कधी खेळामुळे, स्पर्धांमुळे दोन देशात बिघडलेले संबंध सुधारण्यास मदत होते. खेळापुरते का होत नाही सलोख्याचे संबंध निर्माण होतात. राजकीय वादामुळे क्रीडा क्षेत्र अनेक वेळा हादरून निघाले आहे 1965 च्या मेलबर्न ऑलिम्पिक दरम्यान सोव्हिएत युनियन आणि हंगेरी यांच्यातील वॉटर पोलो चा सामना हा 'ब्लड इन द वॉटर' या नावाने ओळखला जातो. तसेच 1972 च्या ऑलिंपिक स्पर्धेदरम्यान शस्त्रधारी पॅलेस्टाईन समूहाने इजराइलच्या 9 खेळाडू, प्रशिक्षक आणि पदाधिकाऱ्याला ओलीस धरले होते. कारण काय तर इजरायल मध्ये कैद असलेले 243 जणांना सोडण्याची मागणी त्यांनी केली. या खेळाडूंची सुटका करताना सर्व खेळाडूंना आपला प्राण गमवावा लागला. हे देशा देशातील वर्चस्व वादाचे, साम्राज्यवादाचे, राजकारणाचे विकृत रूप आहे. यामुळे खेळ भावना संपुष्टात येत आहे.

राजकारणाला बळी पडलेले खेळाडू:- यष्टीरक्षक वृद्धिमान सहा, अंबाती रायडू, करूण नायर, राजू कुलकर्णी असे अनेक खेळातील अनेक खेळाडू हे राजकारणाचे बळी ठरले आहेत. एकाच खेळातील दोन संघटनामुळे त्यांच्यात वाद निर्माण होतात. त्यांच्यातील वादामुळे खेळाडूंना कोणत्या संघटने कडून खेळावे कोणती मान्यता प्राप्त आहे ही माहीत नसते. त्यामुळे बऱ्याचदा बगर मान्यता प्राप्त संघटने कडून खेळल्यामुळे खेळाडूचे नुकसान होते.

निष्कर्ष:-(Conclusion)

वरील विश्लेषण वरुन लक्षात येते की 'खेळ हा खेळ राहिला नाही' या काही राजकारण्यांनी, काही संघटनांनी आणि काही वाईट मनोवृत्तीच्या खेळाडूंनी चांगल्या खेळाला, चांगल्या खेळाडूला राजकारणाचा बळी ठरवले. चांगल्या, गरीब दिन- दलित खेळाडूवर नेहमीच अन्याय झालेला दिसून येतो. खेळातील राजकारणाने गुणवंत खेळाडूंना संपवण्याचा प्रयत्न केला हे आपण उदाहरणादाखल पाहिले आहे. खेळातील घाणेरडे राजकारण हे भारतीय लोकशाहीसाठी घातक ठरत आहे. या गलिच्छ राजकारणाना रोकणे हे भारतीय लोकशाही समोर मोठे आव्हान आहे.

Bibliography:-

1) https://maharashtratimes.com>artical
2) https://maharashtratimes.com>cricket
3) https://divyamarathy.bhaskar.com
4) https://www.loksatta.com.krida
5) https://www.lokmat.com>news
6) https://www.esakal.com>krida
7)https://mfacebook.com>videos

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



396